**महाराष्ट्र शासन**

**सार्वजनिक बांधकाम विभाग**

## कार्यकारी अभियंता, मार्ग प्रकल्प विभाग, जालना

# नागरिकांची सनद

## सुची


| अ.क्र. | तपशील | पृष्ठ क्रमांक |
|---|---|---|
| १ | प्रस्तावना. | ३ |
| २ | कार्यकारी अभियंता मार्ग प्रकल्प विभाग जालना या कार्यालयाची बांधीलकी व नागरीकांची जबाबदारी. | ४ |
| ३ | विभागीय कार्यालयाची रचना | ४ |
| ४ | बाबनिहाय उप विभागांतर्गत येणारे कार्यक्षेत्र/ मुख्यालय दर्शविणारा तक्ता | ५ |
| ५ | कार्यपूतीचे वेळापत्रक | ६ |
| ६ | जनतेच्या गा-हाण्याचे निराकरण व सनदीचा आढावा | ६ व ७ |


## प्रस्तावना

जालना जिल्हयातील मार्ग प्रकल्प विभाग सन-१९५५ पासून कार्यरत आहे. जालना शहरामधील सार्वजनिक बांधकाम परिसर, दुर्गा-माता मंदीराजवळ, जालना येथे या विभागाचे मुख्यालय आहे. सार्वजनिक बांधकाम मंडळ औरंगाबाद अंतर्गत नव्याने प्रस्तावित करण्यात येणा-या रस्ते, पुल, व इमारतीचे सर्वेक्षण करणे. तसेच सर्वेक्षण करण्यात आलेल्या कामाचे अंदाजपत्रके बनविणे, अतिवृष्टीमुळे बुडीत पुलांची उंची वाढविणे, तसेच आवश्यक ठरणा-या पूलांचे सर्वेक्षण व अंदाजपत्रके बनविणे ही कामे मार्ग प्रकल्प विभागामार्फत करण्यात येतात.

नागरीकांचे सार्वजनिक बांधकाम विभागाशी संबंधीत प्रश्न तत्परतेने, सौजन्यपुर्वक व सन्मानपुर्वक सोडविण्यासाठी मार्ग प्रकल्प विभाग कटीबध्द आहे. ही बांधीलकी या सनदेव्दारे जाहीर करण्यात येत आहे. नागरीकांचे प्रश्न सहानुभूतीपूर्वक सोडविण्याचा दृष्टीकोन ठेवून नागरीकांसाठी ही सनद तयार करण्यात येत आहे.

१. नव्याने प्रस्तावित रस्ते, इमारती व पूलांचे अहवाल बनविणे.
२. नव्याने प्रस्तावित करणेत येणा-या रस्ते पुल व इमारती व अतिवृष्टीमुळे पूलांची उंची वाढविणे बाबत सविस्तर सर्वेक्षण करुन अंदाजपत्रके बनविणे.
३. अहवाल, सर्वेक्षण करणे तसेच अंदाजपत्रक बनवितांना प्रकल्प तांत्रिकदृष्या परीपूर्ण तसेच काटकसरीचा व जास्तीत जास्त लोकांना उपयुक्त होईल याची दक्षता घेणे.
४. विभागीय कार्यालयातील सर्व कर्मचारी वर्गाची कर्तव्ये व जबाबदा-या फलकावर जाहिरीत्या प्रदर्शन करणे.
५. माहितीचा अधिकार अधिनियम अंतर्गत या विभागीय कार्यालयाच्या अखत्यारितील माहिती संबंधीतांना विहीत मुदतीत उपलब्ध करून देणे.
६. कार्यालयाच्या कामकाजात सातत्याने तत्परता ठेवून व आधुनिकता आणून या विभागाची तसेच सार्वजनिक बांधकाम विभागाची लोकभिमुखता वाढविणे.
७. विभागीय कार्यालय तसेच विभागांतर्गत उपविभाग संगणकीकृत करुन तातडीची माहिती त्वरीत उपलब्ध होण्यासाठी प्रयत्नशिल राहाणे.
८. विभागातंर्गत अद्यावत माहिती सार्वजनिक बांधकाम विभागाच्या www.mahapwd.com या संकेत स्थावर उपलब्ध करणे.
९. नागरीकांच्या सनदेस व्यापक प्रसिध्दी देणे.

## २) मार्ग प्रकल्प विभाग, जालना या कार्यालयाची बांधीलकी व नागरीकांची जबाबदारी

### अ) मार्ग प्रकल्प विभाग, जालना या कार्यालयाची बांधीलकी

१) सेवेच्या गुणवत्तेची बांधीलकी जोपासणे.
२) सौजन्यपूर्ण व मदतीची भावना ठेवून कामाचा वेळेत निपटारा करणे.
३) कार्यप्रणालीमध्ये पारदर्शकता व निष्ठा ठेवणे.

### ब) नागरीकांची जबाबदारी.

१) शासकीय अधिकारी/कर्मचारी यांच्याशी नागरीकांची वर्तणूक सौहार्दपूर्ण, सहकार्याची व सौजन्यपूर्वक असावी.
२) विहीत केलेल्या कालावधीपेक्षा कमी कालावधीमध्ये सेवा पुरविण्याचा आग्रह धरु नये.
३) नागरीकांनी कायदेशीर तरतूदी, नियम तसेच अलिखीत संकेत यांचे पालन करावे.

## ३) मार्ग प्रकल्प विभाग, जालना कार्यालयाची रचना

कार्यकारी अभियंता मार्ग प्रकल्प विभाग, जालना कर्यालयाची शासनातर्फे जालना या मुख्यालयाचे ठिकाणी दिनांक ३/८/१९५५ रोजी स्थापना झाली असून श्री सत्यनारायणसिंग तत्कालीन कार्यकारी अभियंता कार्यरत होते.

कार्यकारी अभियंता मार्ग प्रकल्प विभाग, जालना हे सा.बां. मंडळ औरंगाबाद अंतर्गत असल्यामूळे या विभागांतर्गत, मार्ग प्रकल्प उप विभाग क्र.१, जालना., मार्ग प्रकल्प उप विभाग क्र.२, जालना., मार्ग प्रकल्प (इमारती) उप विभाग जालना, तसेच औरंगाबाद जिल्हयाकरीता मार्ग प्रकल्प उप विभाग, औरंगाबाद अशी एकूण चार उप विभागीय कार्यालये आहेत. जालना-औरंगाबाद जिल्हयातील पुढे नमूद केल्याप्रमाणे बाबनिहाय कार्यक्षेत्र उप विभागाच्या कार्यक्षेत्रामध्ये येते.

## **बाबनिहाय उप विभागांतर्गत येणारे कार्यक्षेत्र**

| अ.क्र. | उप विभागाचे नांव | बाब | कार्यक्षेत्र |
|---|---|---|---|
| १ | मार्ग प्रकल्प उप विभाग क्र.१ जालना | पूल | संपूर्ण जालना जिल्हा |
| २ | मार्ग प्रकल्प उप विभाग क्र.२ जालना | रस्ते | संपूर्ण जालना जिल्हा |
| ३ | मार्ग प्रकल्प (इमारती) उप विभाग जालना | इमारती | संपूर्ण जालना जिल्हा |
| ४ | मार्ग प्रकल्प उप विभाग, औरंगाबाद | रस्ते, पूल व इमारती | संपूर्ण औरंगाबाद जिल्हा |

विभागाअंतर्गत एकूण चार उप अभियंता कार्यरत आहेत. कार्यकारी अभियंता मार्ग प्रकल्प विभाग, जालना कार्यालयाचा कार्यक्षेत्राचा नकाशा नागरीकांचे सनदेचे सुरुवातीला दर्शविण्यात आलेला आहे.

जालना विभागा अंतर्गत कामांच्या अंमलबजावणीसाठी सा.बां. नियमावली, लेखा संहिता, वेळोवेळी निर्गमीत केलेली परिपत्रके इत्यादीचे काटेकोरपणे पालन क्षेत्रीय अधिका-यांकडुन केले जाते.

## **मुख्यालये दर्शविणारा तक्ता (Chart)**

| कार्यालय | | | मुख्यालय |
|---|---|---|---|
| १) मार्ग प्रकल्प उप विभाग क्र.१, जालना - | - | - | जालना |
| २) मार्ग प्रकल्प उप विभाग क्र.२, जालना | - | - | जालना |
| ३) मार्ग प्रकल्प (इमारती) उप विभाग, जालना | - | - | जालना |
| ४) मार्ग प्रकल्प उप विभाग, औरंगाबाद. | - | - | औरंगाबाद |

## विभागातंर्गत कार्यपूर्तीचे वेळापत्रक, माहितीची सुलभता.

### अ) कार्यपूर्तीचे वेळापत्रक.

| अ.क्र. | कार्यसूची | कार्यवाही करणारा सक्षम अधिकारी | कार्यपूर्तीचा कालावधी /मर्यादा |
|---|---|---|---|
| १ | नव्याने प्रस्तावित करण्यात आलेले रस्ते, इमारती व पुले यांचे सर्वेक्षण करणे. | कार्यकारी अभियंता तसेच उप अभियंता | ६० दिवस |
| २ | माहिती अधिकारात मागण्यात आलेली माहिती | शासकिय माहिती अधिकारी तथा उप कार्यकारी अभियंता | अर्ज प्राप्त झालेपासून ३० दिवसात |
| ३ | माहिती अधिकारातंर्गत प्राप्त अपिलिय अर्ज | अपिलिय अधिकारी तथा कार्यकारी अभियंता | अर्ज प्राप्त झालेंपासून ४५ दिवसांत |

## ब) माहितीची सुलभता

सार्वजनिक बांधकाम विभागाच्या ( www.mahapwd.com ) या संकेतस्थळावर वेळोवेळी सादर केली जाणारी माहिती जनतेला सुलभतेने उपलब्ध होईल.

## ३) गा-हाण्यांचे निराकरण सनदेचा आढावा व जनसामांन्याच्या सूचना

## अ) <u>गा-हाणी/तक्रारी यांचे निराकरण</u>.

कार्यपूर्तीस होणारा विलंब वा अन्य काही गा-हाणी विभागातंर्गत कामाबाबत काही तक्रारी असतील तर त्यासाठी नागरीकांनी ज्या विशिष्ट कार्यालयाविरुध्द गा-हाणे / तक्रार असेल तर त्या कार्यालयाच्या वरिष्ठ कार्यालय प्रमुखाकडे तक्रार नोंदवावी म्हणजे उदाहरणार्थ, उप विभागीय कार्यालया विरुध्द गा-हाणे/तक्रार असल्यास विभागीय कार्यालय प्रमुखांकडे म्हणजे कार्यकारी अभियंता यांचेकडे गा-हाणे मांडावे व तक्रार नोंदवावी. अशा गा-हाणी/तक्रारींचे निराकरण वरिष्ठ कार्यालयाकडून ७ दिवसात करण्यात येईल. गा-हाणी समक्ष भेटीत/पत्राने अथवा ई-मेलव्दारे नागरिक मांडू शकतात.

## ब) <u>नागरिकांच्या सनदेचा आढावा/सिंहावलोकन</u>

या विभागाच्या नागरिकांच्या सनदेच्या उपयुक्ततेबाबतचा तथा परिणामकारकतेचा आढावा मार्ग प्रकल्प विभाग, जालना अंतर्गत घेण्यात येईल व त्याचा अहवाल प्रसिध्द करण्यात येईल.

## क) <u>जनसामान्यांकडून सूचना</u>.

या विभागाची नागरीकांची सनद सर्वसामान्य नागरिकांच्या छाणनीसाठी नेहमीच खुली असेल व सन्माननिय नागरीकांच्या बहूमुल्य सूचनांचा गांभीर्य पूर्वक विचार करुन त्यात वेळोवेळी सुधारणा घडवून आणता येईल. ही नागरीकांची सनद स्तःहून काही नविन कायदेशिर हक्क निर्माण करीत नाही. ती ग्राहकांना म्हणजेच सार्वजनिक बांधकाम विभागाच्या सेवा उपभोगणा-या नागरीकांना जादा हक्क मांडण्यासाठी मदत करते.

## ड) <u>नागरीकांच्या सनदेची अंमलबजावणी</u>

मार्ग प्रकल्प विभागांतर्गत नागरीकांच्या सनदेची अंमलबजावणी करण्यास विभागीय कार्यालय कटिबध्द आहे. सनदेस व्यापक प्रसिध्दी देऊन नागरिकांच्या प्रतिक्रिया/अभिप्राय मागविण्यात येतील व त्यांच्या सूचनांचे यथोचीत आदर करुन आवश्यक बदल करण्यात येतील.

मार्ग प्रकल्प विभाग, जालना खात्रीपूर्वक गुणवत्तेची सेवा पुरविण्याची हमी देत आहे. या विभागीय कार्यालयाच्या अखत्यारितील कुठल्याही माहितीसाठी नागरीकांना संवेदनशील, सौजन्यपूर्वक व मदत करण्याच्या भावनेने वर्तणूक मिळेल. कार्यपध्दती अधिक लोकाभिमुख, सुलभ व आटोपशीर करण्यासाठी नागरीकांचा सल्ला घेतला जाईल. भ्रष्टाचारास आळा घालण्यात येईल तसेच नागरीकांच्या गा-हाण्यांचे कालबध्द निराकरण करण्यात येईल.